# शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादित, नाशिक-४२२ ००२

रजि. ऑफीस - " आदिवासी विकास भवन ", ३ रा मजला, राम गणेश गडकरी चौक, जुना आग्रा रोड, नाशिक-२
दुरध्वनी - (०२५३) २३१५८६०,
Web-www.mahashabari.in E-mail- shabarinsk@gmail.com


जा.क्र.शआविविम/प्रकल्प/प्रशा/११२ /२०२३
नाशिक-२ दिनांक - १२/१०/२०२३

**परिपत्रक**

**विषय- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत राबविण्यांत येणाऱ्या योजनांचा सेवा हक्क (RTS) अंतर्गत समावेश करणेबाबत.**
**संदर्भ-** शासन पत्र क्रमांक- संकीर्ण-२०२३/प्र.क्र.०४/का.३ मंत्रालय, मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर, २०२३

उपरोक्त विषयान्वये व संदर्भिय पत्रान्वये मा.मुख्य आयुक्त, राज्य मुख्य सेवा हक्क आयोग यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे RTS अंतर्गत शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळातील योजनांची माहिती (योजनेचे निकष, लाभार्थी निकष इ.), सेवा देण्यासाठीचा कालावधी, सेवा पुरविणारा अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिल अधिकारी इ. बाबींची माहिती तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.क्र. | सेवेचे नाव | सेवेचे स्वरुप | कालमर्यादा | सेवा पुरविणारा अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी | द्वितीय अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली पुरस्कृत कृषी संलग्न कर्ज योजना | कर्ज मंजुरी बाबत निर्णय | अर्ज स्विकारण्याच्या शेवटच्या तारखेपासून ३० दिवस | शाखा व्यवस्थापक, संबंधीत शाखा कार्यालय. | व्यवस्थापक (प्रकल्प) शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक. | महाव्यवस्थापक (प्रशासन) शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक. |
| | | कर्जाचे वितरण | एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली कडून निधी मिळाल्यापासून ३० दिवस किंवा कर्ज मंजूर झाल्याच्या तारखेपासून ३० दिवस यापैकी जे आधी असेल ते | | | |
| 2 | एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली पुरस्कृत माहिला सक्षमीकरण योजना | कर्ज मंजुरी बाबत निर्णय | अर्ज स्विकारण्याच्या शेवटच्या तारखेपासून ३० दिवस | | | |
| | | कर्जाचे वितरण | एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली कडून निधी मिळाल्यापासून ३० दिवस किंवा कर्ज मंजूर झाल्याच्या तारखेपासून ३० दिवस यापैकी जे आधी असेल ते | | | |
| ३ | एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली पुरस्कृत लघु उद्योग कर्ज योजना | कर्ज मंजुरी बाबत निर्णय | अर्ज स्विकारण्याच्या शेवटच्या तारखेपासून ३० दिवस | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | कर्जाचे वितरण | एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली कडून निधी मिळाल्यापासून ३० दिवस किंवा कर्ज मंजूर झाल्याच्या तारखेपासून ३० दिवस यापैकी जे आधी असेल ते | | | |
| ४ | एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली पुरस्कृत स्वयंसहाय्यता बचतगट योजना | कर्ज मंजुरी बाबत निर्णय | अर्ज स्विकारण्याच्या शेवटच्या तारखेपासून ३० दिवस | | | |
| | | कर्जाचे वितरण | एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली कडून निधी मिळाल्यापासून ३० दिवस किंवा कर्ज मंजूर झाल्याच्या तारखेपासून ३० दिवस यापैकी जे आधी असेल ते | | | |
| ५ | एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली पुरस्कृत आदिवासी समाजांना मोठया प्रमाणात वित्तपुरवठा | कर्ज मंजुरी बाबत निर्णय | अर्ज स्विकारण्याच्या शेवटच्या तारखेपासून ३० दिवस | | | |
| | | कर्जाचे वितरण | एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली कडून निधी मिळाल्यापासून ३० दिवस किंवा कर्ज मंजूर झाल्याच्या तारखेपासून ३० दिवस यापैकी जे आधी असेल ते | | | |

सोबत- १ ते २ पाने

(लाभार्थी व योजना निकष)

Leena Bansod

**(लीना बनसोड,भा.प्र.से.)**
व्यवस्थापकीय संचालक
शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या.,
नाशिक-२

# शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक-२.

**१) योजना- राष्ट्रिय अनुसूचित जमाती वित्त व विकास महामंडळ, नवी दिल्ली (एन.एस.टी.एफ.डी.सी.) पुरस्कृत कर्ज योजना**

**योजनेचे स्वरुप-**

**अ) राष्ट्रिय अनुसूचित जमाती वित्त व विकास महामंडळ, नवी दिल्ली (एन.एस.टी.एफ.डी.सी.) पुरस्कृत मुदत कर्ज योजना -**

वित्तीय विगतवारी

| | |
|---|---|
| i)एन.एस.टी.एफ.डी.सी.कर्ज हिस्सा | ९०% |
| ii)शबरी महामंडळ मार्जीन कर्ज हिस्सा | १०% किंवा ५% |
| iii)लाभार्थी वैयक्तिक सहभाग | १०% किंवा ५% |

**ब) राष्ट्रिय अनुसूचित जमाती वित्त व विकास महामंडळ, नवी दिल्ली पुरस्कृत महिला सशक्तीकरण योजना :-**

वित्तीय विगतवारी

| | |
|---|---|
| i)एन.एस.टी.एफ.डी.सी.कर्ज हिस्सा | ९०% |
| ii)शबरी महामंडळ मार्जीन कर्ज हिस्सा | १०% |
| iii)लाभार्थी वैयक्तिक सहभाग | निरंक |

**क) स्वयंसहाय्यता बचतगट योजना-**

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत अनुसूचित जमातीतील महिलांचे जीवनमान उंचावण्याकरीता स्वयंरोजगारासाठी स्वयंसहाय्यता बचतगट योजना राबविण्यांत येते.

वित्तीय विगतवारी

| | |
|---|---|
| i)एन.एस.टी.एफ.डी.सी.कर्ज हिस्सा | ९०% |
| ii)शबरी महामंडळ मार्जीन कर्ज हिस्सा | १०% |
| iii)लाभार्थी वैयक्तिक सहभाग | निरंक |

**योजनेचा उद्देश-** शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत अनुसूचित जमातीतील बांधवांचे जीवनमान उंचावण्याकरीता स्वयंरोजगारासाठी कर्ज योजना राबविण्यांत येतात.

**अंमलबजावणी कार्यपद्धती-** एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली पुरस्कृत कर्ज योजना राबविणेकामी शाखा कार्यालय स्तरावर संबंधित कार्यक्षेत्रातील प्रकल्प अधिकारी हे मुल्यमापन समितीचे अध्यक्ष आहेत. सदर योजनेसाठी प्राप्त प्रस्तावानुसार शाखा व्यवस्थापक, शबरी महामंडळ यांनी आयोजित केलेल्या सभेस संबंधित प्रकल्प अधिकारी उपस्थित राहून योग्य व पात्र लाभार्थीची निवड होणेकामी उपस्थित इच्छुक उमेदवारांची मुलाखत, कागदपत्र पडताळणी तसेच कर्ज परतफेड करु शकणाऱ्या लाभार्थींचा मुल्यमापन समितीचे शिफारशीने मुख्य कार्यालयास प्रस्ताव सादर करण्यांत येतो. त्यानुसार शाखा कार्यालयाकडील संबंधित लाभार्थींचे प्राप्त प्रस्तावास मुख्य कार्यालयाकडून मंजुरी देण्यांत येते.

**कर्ज योजनांसाठी पात्रता अटी :-**

१) लाभार्थी अर्जदार आदिवासी समाजाचा असावा.

२) लाभार्थीचे वार्षिक कौटुबिक उत्पन्न ग्रामीण व शहरी भागासाठी उत्पन्नाची मर्यादा रु.३,००,०००/- इतकी आहे.

३) लाभार्थीची वयोमर्यादा सर्व योजनांसाठी १८ वर्ष ते ४५ वर्ष या दरम्यान असावी.

४) महिला सशक्तीकरण योजनेसाठी व स्वयंसहाय्यता बचतगट योजनेसाठी लाभार्थ्यांकडून कोणताही वैयक्तिक सहभाग मार्जीन मनी अपेक्षित नाही. तथापि इतर योजनांसाठी स्वतःचा हिस्सा म्हणून ५% सहभाग रक्कम घेण्यांत यावी.

५) महिला लाभार्थ्यांच्या बाबतीत जात प्रमाणपत्र नसल्यास महिलेच्या पतिचे अथवा मुला मुलींचे जात प्रमाणपत्र देखील ग्राहय धरावे.

६) रक्कम रु.५.०० लक्ष पेक्षा अधिक कर्ज योजनेसाठी एक सक्षम जामीनदार घेण्यांत यावे.

**कर्ज योजनांसाठी आवश्यक कागदपत्रे :-**

१) तहसिल किंवा उपविभागीय कार्यालय (प्रांत) यांचा जातीचा दाखला. (फक्त आदिवासी)

२) शाळा सोडल्याचा दाखला. (वय वर्ष १८ ते ४५)

३) तहसिल कार्यालयाकडील उत्पन्नाचा दाखला. (ग्रामीण व शहरी भागासाठी रु.३,००,०००/- इतके असावे.)

४) व्यवसाय करण्यासाठी ग्रामपंचायत क्षेत्रासाठी स्वयंघोषणापत्र व नगरपालीका क्षेत्रासाठी दुकाने अधिनियमाखालील परवाना.

५) व्यवसाय प्रकल्प अहवाल संबंधित शाखा व्यवस्थापक यांनी स्वतः इच्छुक लाभार्थींना मार्गदर्शन करुन संक्षिप्त रित्या तयार करुन देणे.

६) व्यवसायासाठी लागणारे सर्व साहीत्याचे कोटेशन.

७) रेशनकार्ड छायाप्रत.

८) आधारकार्ड.

९) पॅनकार्ड असल्यास त्याची छायाप्रत.

१०) लाभार्थ्यांचे स्वतःचे बँक खात्याचे पासबुकची छायाप्रत.

११) तीन पासपोर्ट साईज फोटो.

१२) वाहन व्यवसायासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालय (RTO) यांचे प्रचलित कायद्यानुसार परमीट वाहनासाठी आवश्यक कागदपत्रे.

**बचतगट / सहकारी संस्थांसाठी आवश्यक कागदपत्रे-**

१) बचतगट / सहकारी संस्थांचे नोंदणी प्रमाणपत्र.

२) बचतगट / सहकारी संस्थांचे सर्व सभासद यादी, त्यांचे रेशनकार्ड व जातीचे दाखले.

३) बचतगट / सहकारी संस्थांचे कमीत कमी सहा महिन्यांचे बँक खाते उतारा / स्टेटमेंट.

४) व्यवसाय करण्यासाठी ग्रामपंचायत क्षेत्रासाठी स्वयंघोषणापत्र व नगरपालीका क्षेत्रासाठी दुकाने अधिनियमाखालील परवाना.

५) व्यवसायासाठी लागणाऱ्या साहित्याचे कोटेशन.

**योजनानिहाय व्याजदराचा तपशिल-**

१) महिला सशक्तीकरण कर्जावर द.सा.द.शे.४% एवढया अल्प दराने सरळ व्याज आकारले जाते.

२) रु.५ लक्ष पर्यंतचे कर्जावर द.सा.द.शे.६% सरळ व्याज आकारले जाते. तर रु.५ लक्ष ते रु.१० लक्ष पर्यंतचे कर्जास द.सा.द.शे.८% सरळ व्याज आकारणी केली जाते.

३) रु.१० लक्ष वरील कर्जास द.सा.द.शे.१०% सरळ व्याज आकारले जाईल.